# भारतीय विकास प्रशासन समोरील समस्या : एक अध्ययन

*डॉ. चव्हाण पंडितराव लक्ष्मणराव

भारत हा विकसनशिल देश आहे. 15 ऑगस्ट 1947 ला स्वतंत्र झाल्यानंतर या देशासमोर विकासाच्या अनेक समस्या होत्या. ब्रिटीशांच्या अमलाखाली भारताची मोठ्या प्रमाणात पिळवणूक झाली. सामान्य जणाना अत्यंत हालाकीचे जिवन भोगावे लागले. सामान्य नागरिकांचे जिवन साचलेल्या डबक्या सारखे झाले होते. भारतीय नेतृत्वासमोर स्वतंत्र झाल्यानंतर विकसित भारताची कल्पना होती. त्यामुळे भारतीय नेतृत्वाने कल्याणकारी राज्य ही कल्पना स्विकारली. भारतीय राज्य घटनेतील कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेनूसार स्वातंत्र्योत्तर भारतात धोरणे ठरविण्यात आली. घटनेतील भाग तीन नुसार भारतीय नागरिकांना मुलभूत अधिकार प्रदान करण्यात आले. भाग चार नुसार राज्य धोरणाच्या नितीनिर्दे तक तत्वांना अनुसरून भारतीय विकासाची धोरणे ठरविण्यात येऊ लागली.

सुरूवातीच्या काळात मिश्र अर्थव्यवस्था स्विकारल्यामुळे औद्योगिक धोरण ठरवताना काही उद्योग खाजगीक क्षेत्रात दिली गेली व काही उद्योग शासनाने उघडले. उद्योगामध्ये नवनविन तंत्रज्ञान आणुन रोजगार निर्मितीची त्याच बरोबर आर्थिक उन्नतीची कास धरण्यात आली. यातुन अनेक शहरे उद्योग नगरी म्हणून उदयास आली. दळण वळण या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली. सहकार क्षेत्राच्या माध्यमातुन सर्व जनतेचा सहभाग शासकिय कामात घेण्यात येऊ लागला. शिक्षण क्षेत्र, उद्योग, शेती, दळण वळण, परराष्ट्र व्यापार या क्षेत्रामध्ये 1970 ते 1980 या दशकामध्ये भारताने मोठ्या प्रमाणात आघाडी घेतली. अनेक वस्तुमध्ये आयातीवर अवलंबून असणारा भारत निर्यातीतही आघाडी घेऊ लागला. 1980 ते 1990 या दशकात आर्थिक उन्नतीचा दर मध्यम राहिला. 1991 ला मुक्त अर्थव्यवस्था स्विकारल्या नंतर भारतीय मणुश्य बळास जगाचे दरवाजे खुले झाले. यामुळे हजारो विद्यार्थी जगातील वेगवेगळ्या देशात रोजगार मिळविण्यासाठी गेले. वेगवेगळ्या उद्योगामध्ये परकिय गुंतवणूक भारताकडे आर्कशिली जाऊ लागली. यामुळे भारताच्या गंगाजळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. गंगाजळीच्या मजबुतीमुळे आयात निर्यात धोरणावर सकारात्मक परिणाम होऊन भारत जगाच्या पाठीवर एक समृद्ध राष्ट्र म्हणून चर्चा होऊ लागली. या भारताच्या झाल्या जमेच्या बाजु. या सर्व बाबी घडत असताना भारतातील वेगवेगळ्या शिक्षण संस्थेतुन निर्माण झालेले सुशिक्षीत तरूण रोजगार न मिळाल्यामुळे बेकार म्हणून वावरू लागला. हाच बेकार तरूण रोजची रोजी रोटी मिळविण्यास असमर्थ ठरल्यामुळे नक्षलवाद, आतंकवाद, जातीवाद, धर्मवाद, अश्या अनेक वादामध्ये आडकु लागला. यातुन भारताची कायदा व सुव्यवस्था याचे प्रश्न निर्माण झाले. भारताचा विकास होत असताना विकासाची फळे सर्वाना न मिळता काही धन दांडग्याच्या ओटीत गेली व सामान्य जन विकासापासुन दरच राहिला. देशाचा समतोल विकास झाला नाही. काही राज्य विकासात आघाडीवर गेली तर काही राज्य पिछाडीवर पडली. पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे पाऊसाळ्यात भरपुर पाऊस पडूनही उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी जनता तहानलेलीच राहिली. कोरडवाहु शेतीचे प्रमाण प्रचंड आहे. पाहिजे त्याप्रमाणात जलसिंचनाची व्यवस्था निर्माण झाली नाही. शेतक–याच्या जमिनी घेऊन निर्माण झालेली धरणे शेती ऐवजी उद्योगाला व नगराना पाणी पुरवण्यातच धन्यता मानु लागली. यामुळे शेतकरी कंगालच राहिला. या देशातील समाज 80 टक्के शेतीवर अवलंबुन राहणारा असून शेती ही मागासलेली आहे. शेतीसाठी वापरली जाणारी शाधने जुनीच आहे. लोक संख्येची वाढही मोठ्या प्रमाणात होत आहे. जागतीक पातळीवर भारत हा तिस–या जगातील देश म्हणून ओळखला जातो. तिस–या जगातील देशातील समाज परंपरा प्रिय, रूढीग्रस्थ व बदलण्याची फारसी उत्सुक्ता नसलेला आहे. यासर्व पार्श्वभुमीवर विकास साधत असताना भारतीय विकास प्रशासनासमोर अनेक समस्या आहे. या समस्यांचा बारकाव्याने व साकल्याने विचार होणे अवश्यक आहे. जो पर्यंत विकास साधताना येणा–या समस्या जाणुन घेऊन त्या कृया सोडवाव्या व त्याच्या मागे असणा–या पार्श्वभुमी याचा अभ्यास होणार नाही तो पर्यंत विकास प्रशासनाला अपेक्षीत गती प्राप्त करणे कठिण जाणार आहे. या दिशेने विचार होणे महत्वाचे आहे.

**उद्दिश्टये :–**1. भारतीय विकास प्रशासना समोरील समस्यांचा शोध घेणे. 2. भारतीय राजकिय नेतृत्वांच्या इच्छा शक्तीचा शोध घेणे. 3. भारतीय प्रशासकिय नेतृत्वाच्या गुणवत्तेचा अभ्यास करणे. 4. भारतीय विकास प्रशासनास समस्या बाबत उपाय सुचविणे.

**गृहितकृत्ये** :–1. स्वातंत्र्योत्तर निर्माण झालेले भारतीय नेतृत्व प्रबळ इच्छा शक्ती असणारे आहे.2. विकास शाधताना संख्यात्मक वाढ झाली पण गुणात्मक घसरण थांबवता आली नाही. 3. सिघ्रगतीने विकास साधतांना गरिब श्रीमंतातील दरी वाढली. 4. विकासापासुन वंचित असणारा मोठा वर्ग आजही भारतात अस्तित्वात आहे.

* लोक प्रशासन विभाग, वंसतराव नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वसरणी नांदेड

**संशोधन पद्धती** :—प्रस्तुत संशोधन शास्त्रीय पद्धतीने केले आहे. निश्चित उद्धेश प्राप्तीसाठी नियोजन बद्ध संशोधन कार्य केले आहे. विश्लेषणात्मक व वर्णनात्मक अध्ययन पद्धतीचा उपयोग करून अध्ययन करण्यात आले आहे. संशोधनाच्या अंती समस्येवरील उपाय सुचविण्यात आलेले आहेत.

**विकास प्रशासन** :—विकास म्हणजे विशिष्ट दिशेने व विशिष्ट हेतूने केलेले कार्य ज्यात असे गृहित धरले जाते की मानव आजू बाजूच्या वातावरणावर मात करून त्यात आपणाला हवे तसे बदल घडवून आणूषकतो. सर्वच बाबी निसर्गावर अवलंबून राहण्याची आव यकता नाही.''विकासासाठी प्रशासन म्हणजे नियोजनबद्ध आर्थिक विकास आणि काही प्रमाणात शिक्षण व सार्वजनिक आरोग्य या सारख्या देशाच्या सामाजिक सेवेत सुधारणा करणे होय'' — **मॉटे गोमटी**

''व्यवहारिक उद्दिश्टांच्या पुर्ततेसाठी मार्गदर्शित केलेला व दिग्दर्शित केलेला बदल म्हणजे विकासासाठी प्रशासन'' — **ड्वाईट वॅल्डो.**

''विकासासाठी प्रशासन ही कृतीप्रधान व ध्येयप्रधान व्यवस्था आहे. ठराविक उद्दिष्ट असण्यापेक्षा ती एक मनाची अवस्था, प्रवृती अगर दिशा आहे.''—**विडनर**

**सिघ्रगतीने विकास**:—जागतिक पातळीवर भारत हा देश सन्मानाने जगावा अशी सर्व भारतीयांची आत्मिक इच्छा आहे. हे घडून येण्यासाठी भारतातील साधन, संपत्ती व मनुष्य बळाचा विकास झाला पाहिजे. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण याच बरोबर तांत्रिक व व्यवसायीक शिक्षण या गरजा पुर्ण करणे अत्यंत महत्वाचे आहे. अधुनिक तंत्रज्ञान व्यापा—याच्या नविन कल्पना, नविन आर्थिक धोरण नेटाची राबवणे अव यक आहे. यासाठी राजकीय नेतृत्वाची जबर इच्छा शक्ती व प्रशासकीय कौशल्य प्राप्त करणे क्रम प्राप्त आहे. यासाठी नव तरूणाना मोठ्या प्रमाणात शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची अवश्यकता आहे. सर्वानसाठी आरोग्य मागेल त्याला काम अन्न व निवारा या गरजा सिघ्रगतीने पुरविण्याची अवश्यकता आहे. एकीकडे कुरापतखोर पाकिस्तान व ऐकीकडे बलाढ्य चिन्ह याच्यासी सामना करण्यासाठी स्वरक्षणावर येथोचीत खर्च करणेही तेवढयाच महत्वाचे आहे. औद्योगिक प्रगती साधताना पर्यावरणाची काळजी घेणेही महत्वाचे आहे. आधुनिक विचार व नव समाज निर्माण करताना भारताच्या स्वाभिमानाला कायम चेतवत ठेवणा—या ऐतिहासीक वार याचे जतन करणेही आपली जबाबदारी ठरते. शिक्षणाकडे लक्ष देताना महिला शिक्षण व महिलाचे सबलीकरण होणे अवश्यक आहे. विकासाची वाट धरताना एकुन समाजाच्या 50 टक्के असणा—या स्त्रीया चुल आणि मुल यामध्ये गुंतवुण ठेवणे व त्यांच्या बुद्धीमतेचा व कतृत्वाचा विकासाठी उपयोग न करणे भारताचा परवडणे नाही. या सर्व हाताला कामाला लावुन घेलल्यास भारताचा विकास सिघ्रगतीने होऊ भाकतो.

**भारतीय प्रशासन** :—भारतीय प्रशासन हे 3 स्तरावर कार्यरत आहे.1. केंद्रिय स्तर 2. राज्यस्तर 3. स्थानिकस्तर भारतीय प्रशासनात कामाच्या तिन सुची तयार करण्यात आल्या आहे.1. केंद्र सुची — 97 विषय 2. राज्य सुची—61 विषय 3. समवर्ती सुची —47 विषय

यानुसार केंद्र सुचीतील विशया बाबत केंद्र शासन निर्णय घेते राज्य सुची बाबत राज्य निर्णय घेते व समवर्ती सुची बाबत दोन्ही शासन आपआपले कार्य करते. या विशयानुरूप प्रशासन व्यवस्था तयार झालेली आहे. भारतात एकुन 28 राज्य व 7 केंद्र शासित प्रदेश आहे. राज्य स्तरावरील व्यवस्था राज्य शासन पार पाडीत असते. राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी प्रशासनाचे मुख्यालय असते. राज्यकाही विभागात विभागण्यात येते. राज्यात सर्व साधारण 4 ते 7 विभाग असतात. प्रत्येक विभाग 5 ते 7 जिल्ह्याचा मिळूण झालेला असतो. जिल्हा हा प्रशासनाचा अंतिम घटक आहे. जिल्हा प्रशासनाचा प्रमुख हा जिल्हा अधिकारी असतो. जिल्हा अधिका—याच्या नियंत्रणाखाली महसुल, पोलीस, अधिकोश व इतर यंत्रणा असते. जिल्हा अधिकारी हा भारतीय प्रशासन सेवेद्वारे निवडला गेलेला अधिकारी असतो. स्थानिक स्व शासन संचलनासाठी जिल्हा परिशदा जिल्हा पातळीवर, पंचायत समिती तालुका पातळीवर व ग्रामपंचयात ग्राम पातळीवर कार्यरत असतात. शहर प्रशासनसाठी महानगर पालिका, नगर पालिका व नगर परिशदा कार्यरत असतात. प्रत्येकाची आपली स्वतंत्र प्रशासन व्यवस्था असते.

**विकास प्रशासनासमोरील समस्या** :—केंद्रिय पातळीपासुन ते स्थानिक पातळीपर्यंत पसरलेली भारताची प्रशासन व्यवस्था ही भली मोठी प्रशासन व्यवस्था आहे. सर्व साधारण प्रथम वर्ग कर्मचा—यापासुन ते चतुर्थ श्रेणी कर्मचा—यापर्यंत केंद्र, राज्य व स्थानिक शाासकिय निम शासकिय कर्मचा—याची एकुन संख्या 1.5 कोटीच्या आसपास आहे. एवढया मोठ्या प्रशासन व्यवस्थेस हताळुन विकास साधत असताना विकास प्रशासनासमोर अनेक समस्या निर्माण होणे कर्मप्राप्त आहे. प्रस्तुत अभ्यासात काही प्रमुख समस्या अध्ययनासाठी घेण्यात आल्या आहेत.

**1) राजकिय नेतृत्व** :—भारताने संसदीय लोकशाही पद्धती स्विकारल्यामुळे राजकीय नेतृत्व निवडणुकीच्या माध्यमातुन निश्चित केलेल्या मतदार संघातुन निवडून येत असते. ऐकंदरीत भारतीची जनता व त्याचे शिक्षण पाहता नेतृत्व निवडुण देत असताना जनता समजदारीने निर्णय घेतेच असे नाही. तरीही मागील 50 वर्षात भारताच्या शिर्ष स्थानि राहीलेले नेतृत्व प्रगल्भ होते असे दिसुन येते.

**2) प्रशासकिय नेतृत्व** :—भारतीय प्रशासकिय नेतृत्व स्पर्धात्मक परिक्षेद्वारे निवडले जाते. अश्या निवडलेल्या उमेदवाराना योग्य प्रशिक्षण देऊन प्रशासनाच्या कामास लावले जाते. वरवर पाहता हि पद्धती निशप्रहः दिसत असली तरीही अनेक आड मार्गाचा वापर करून कमजोर उमेदवार यात घुसडले जातात. अश्या परिक्षेतुन आलेले नेतृत्व बुद्धीने हुशार असले तरी त्यांना सामान्य जणाचे ज्ञान असेलच असे नाही. त्यामुळे हे प्रशासकिय नेतृत्व विकासाचे वाहक होण्या एवजी विकासापुढे गतीरोधक म्हणून पुढे येतात.

**3) राष्ट्रीयत्वाचा अभाव** :—भारतीय समाज हा विविध जाती धर्म पंत यात विभागलेला समाज आहे. स्वतंत्र्याच्या काळात राष्ट्र प्रेमाने असलेली पिढी कार्यरत होती. स्वातंत्र्योतर काळात राश्ट्र प्रेमाची भावना कमी होऊन स्वार्थी अपल पोटी व अप्तस्वकीयांची हित जपणारी पिढी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. यातुन येणारे राजकिस व प्रशासकिय नेतृत्व ही प्रशासनासमोरील सर्वात मोठी समस्या आहे.

**4) वाढती लोकसंख्या** :—स्वतंत्र्योतर काळात भारताची लोकसंख्या प्रचंड वाढली आहे. यामुळे उत्पादनाची साधन विकासित होऊनही या लोकसंखेची गरज पुरवण्यास प्रशासन अपुरे पडत आहे. यामुळे आरोग्य अन्न वस्त्र व निवारा याबाची भोवटच्या घटकापर्यंत पुरवल्या जाऊ भाकत नाहीत. ही प्रशासनासमोरिल फार मोठी समस्या आहे.

**5) वाढती बेकारी** :—लोक संखेत होणारी प्रचंड वाढ व त्या अनुसंघाने शिक्षणात सहभाग होणारे तरूणाची संख्या याना भारतीय प्रशासन व्यवस्था सामावुन घेवु भाकलेली नाही. निर्माण होणारे काम व शिकुन बाहेर पडणारे बेकाराचे लोंडे हे याचे व्यस्थ प्रमाण आहे. ही प्रशासनासमोरील सर्वात मोठी समस्या आहे.

**6) वाढते गुन्हेगारीकरण** :—शिक्षण घेऊन बेकार पडलेले तरूण गुन्हेगारी जगताकडे वळत आहेत. त्यामुळे गुन्ह्याचे प्रकार व पद्धती या एकदम अधुनिक व विकृत रूप धारण करत आहे. शिकलेली बुद्धी योग्य कामासाठी न वापरता आल्यामुळे हेच शिकलेले तरूण गुन्हेगारीकडे वळल्यामुळे प्रशासनासमोर नविनच समस्या निर्माण झालेली आहे.

**7) आतंकवाद नक्षलवाद** :—अनेक समस्याला तोंड देत असलेली तरूण अतंकवाद्याकडे व नक्षलवाद्याकडे वळत आहे. काही मातेफिरू लोकाकडून त्याना समाज विघात व अधुनिक भास्त्र आस्त्रचा पुरवठा करून कायदा व सुव्यवस्था बिगडविण्याचे कार्य केले जात आहे.

**8) भोती व भोतीचे प्रश्न** :—भारतातील 80 टक्के जनता भोती प्रधान आहे. त्यातील बहुतास भोती पाऊसाच्या पाण्यावर अवलंबुन आहे. त्यामुळे खर्चा पेक्षा कमी होणारे उत्पादन भोतक—याचे जिवन आणखी हालाकीचे बनवत आहे. त्यामुळे भोती सोडून भाहराकडे धाव घेण्योच प्रमाण वाढले आहे.

**9) वाढते भाहरी करण** :—भाहराकडे जनतेचा लोंडा मोठ्या प्रमाणात प्रवाहीत झाला आहे. त्यामुळे भाहरालगत बकाल झोपडपट्य, गलिच्छ वस्ती, गुन्हेगारी, वैश्या व्यवसाय व इतर कामे करणा—या प्रवर्ती वाढण्यास वाढते भाहरीकरण कारणीभुत ठरले आहे. या भाहरावर व्यवस्था पुरविण्याचा प्रचड ताण वाढला आहे. त्यामुळे भाहरांना अपेक्षीत निधी मिळु भाकत नाही. या भाहर विकासाचे अनेक योजना कार्यन्वित होऊनही या वाढत्या लोंड्याला पुरवठा करणे अशक्य प्राय झाले आहे.

**उपाय** :—या सर्व समस्यावर खालील प्रमाणे उपाय योजना केल्यास काही प्रमाणात स्थिती सुधरू भाकते. 1) शिक्षण पद्धतीचा मोठ्या प्रमाणात विकास करणे. 2) तरूणाना स्वरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. 3) लघु उद्योग वाढीस प्रोत्साहन देणे. 4) ग्रामविकासावर भर देणे. 5) भोतीसाठी अधुनिक तंत्रज्ञानाचे बि—बियाणे, खते, तंत्रज्ञान उपलब्ध करून देणे. 6) प्रगल्भ राजकिय नेतृत्व निवडुण देणे. 7) प्रशासनामध्ये होतकरू व समाजाभिमुख कर्मचा—याची निवड करणे. इत्यादी उपाय योजना केल्यास प्रशासनासमोरील समस्या कमी होऊ भाकतात. व भारतीय राज्य घटना काराना अपेक्षित असलेला भारत निर्माण होण्यास मदत होईल.

## सन्दर्भ ग्रन्थ

1) जोशी प्रीता, विकास प्रशासन, आर बी एस ए पब्लिशर्स, सवाई मानसिंह हाईवे, जयपुर—302003, प्रथम संस्कार 1987 2) काकडे सुरेश, विकास प्रशासन, प्राची प्रकाशन, सदाचार, रैयाणी ग्राम शिंपोली रस्ता, बोरीवली, मुंबई प्रथम आवृत्ती—1983 3) Tumar Anil, Administration of India Under the British, D.R Associates (Publi cation division Lucknow. 1994. 4) नाईक नंदकुमार, लोकप्रशासन व व्यवस्थापन, स्टडी सर्कल ग्रुप पब्लीकेशन डिव्हीजन, मुंबई 5) फडिया बी.एल. लोक प्रशासन, साहित्य भवन पब्लिकेशन्स : आगरा, 1985.